



| वर्ष - 8 | अंक - 250 | UDYAM-MH-26-0158827 |


# महाईन्यूज™

## आतील पानांत


- दिल्लीचा हैदराबादवर विजय!
- शेन वॉर्नच्या मृत्यूमागे भारतीय औषध?
- ओडिशात पुन्हा एकदा रेल्वेचा अपघात
- इंडिगोला आयकर विभागाचा दणका



www.mahaenews.com | सोमवार, दि. 31 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## औद्योगिक विजेचा सर्वाधिक दर महाराष्ट्रात

# विजेच्या लपंडावामुळे उद्योगांचा खेळखंडोबा!

## हिंजवडी आयटी पार्कसह पुण्यातील उद्योजक हवालदिल

।पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज



**उद्योगांना पूरक वातावरण निर्माण करण्याच्या घोषणा सरकारी पातळीवरून सातत्याने सुरू असतात. त्या प्रत्यक्षात किती उतरतात, याचा अनुभव सध्या पुणे जिल्ह्यात येत आहे. कोणत्याही उद्योगाची प्रमुख गरज अखंडित वीजपुरवठा ही असते. उद्योगांची नेमकी हीच गरज सध्या पूर्ण होताना दिसत नाही. विशेष म्हणजे, देशात औद्योगिक विजेचा सर्वाधिक दर महाराष्ट्रात आहे. त्यामुळे महागडी वीज घेऊनही पुणे जिल्ह्यातील उद्योजक हवालदिल झाल्याचे चित्र आहे.**

उद्योगांना पूरक वातावरण निर्माण करण्याच्या घोषणा सरकारी पातळीवरून सातत्याने सुरू असतात. त्या प्रत्यक्षात किती उतरतात, याचा अनुभव सध्या पुणे जिल्ह्यात येत आहे. एखाद्या भागात गुंतवणूक करताना उद्योग, जमीन आणि पाण्यासोबत अखंडित वीजपुरवठ्याची हमी सरकारकडे मागतात. पुण्यात उद्योगांना जमीन



आणि पाणी मिळत आहे; मात्र, अखंडित वीजपुरवठा देण्यात यंत्रणा अपयशी ठरल्या आहेत. हीच परिस्थिती राहणार असेल, तर सरकार कोणत्या बळावर उद्योगांना गुंतवणूक करण्यास सांगते, असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित झाला आहे. दर वर्षी उन्हाळ्यात विजेची मागणी वाढल्यानंतर वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढतात. आताही तोच प्रकार पुण्यातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये सुरू आहे. याला अगदी हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कही अपवाद नाही. वीजपुरवठा खंडित झाल्याने उद्योग त्रस्त झाले आहेत. चाकण औद्योगिक वसाहतीत मागील काही काळापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. उन्हाळ्यात हे प्रमाण वाढल्याने उद्योगांना मोठा फटका बसत आहे. अनेक कंपन्यांना काम बंद ठेवावे लागत असून, त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

याबाबत फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सचिव दिलीप बटवाल म्हणाले, की वीजपुरवठा खंडित करण्याची कोणतीही पूर्वसूचना कंपन्यांना दिली जात नाही. देखभालीचे काम सुरू असेल, तरी महावितरणकडून आधी कळविले जात नाही. यामुळे कंपन्यांचे काम अचानक बंद पडते. उन्हाळ्यात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण आणखी वाढले आहे. यामुळे काम बंद राहून उत्पादन ठप्प झाले आहे. वीज पुरवठ्याचा दाब कमी-जास्त झाल्याने महागडी यंत्रसामग्री खराब होत आहे. काम बंद असतानाही कामगारांना वेतन देण्याची वेळ आली आहे. याचा आर्थिक फटका कंपन्यांना बसत आहे.

पिंपरी-चिंचवड परिसरातील लघुउद्योजकही वीज पुरवठ्याच्या समस्यांमुळे त्रस्त झाले आहेत. याबाबत पिंपरी-चिंचवड लघुउद्योग

### अशीही काही कारणे...

वीज पुरवठा खंडित होण्यामागे केवळ वीज यंत्रणा कारणीभूत नसून, इतरही घटकांचा समावेश आहे. हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वीजपुरवठा गेल्या १० ते १५ दिवसांत ३ वेळा खंडित झाला. यामागे आंबेगाव तालुक्यातील डोंगराळ भागातील गवत पेटविण्याच्या घटना कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. या भागात ग्रामस्थ गवताला आग लावतात. तिथे नजीक वीजवाहिनी असल्यास ती बंद पडते. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होतो. परिणामी महापारेषणच्या कर्मचाऱ्यांवर या भागात गस्त घालण्याची वेळ आली आहे.

वीजपुरवठा खंडित होत असल्याने लघुउद्योगांचे मोठे नुकसान होत आहे. सध्या मार्चअखेर असून, कार्यादेश पूर्ण करण्याची उद्योगांची धावपळ सुरू आहे. दिवसांतून भरल्यास तातडीने वीजपुरवठा तोडला जातो. आता वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे उद्योगांच्या होणारी नकुसानीची भरपाई महावितरणने द्यायला हवी.

# मुख्यमंत्र्यांनी घेतले कुलदैवताचे दर्शन

## विठ्ठलाला साक्षी ठेवून हर्षवर्धन पाटलांनी घेतली भेट

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नूतन मराठी वर्ष प्रारंभाच्या पूर्वसंधीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले कुलदैवत इंदापूर तालुक्यातील नीरा नरसिंहपूर येथील भीमा-नीरा नदीच्या संगमावरील प्राचीन व प्रसिद्ध श्री. लक्ष्मी नृसिंहाचे दर्शन घेऊन विधीवत पूजा,आरती करून दर्शन घेतले.यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार विजय शिवतारे, राहुल कुल, माजी आमदार राम सातपुते, आदी उपस्थित होते.**



दरम्यान ,मुख्यमंत्र्यांनी श्री. क्षेत्र नीरा नरसिंहपूर विकास आराखड्यातील कामांच्या प्रगतीची अधिकाऱ्यांकडून व विश्वस्तांकडून माहिती घेतली. देवस्थान ट्रस्टच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.ग्रामस्थांच्या वतीने सरपंच अर्चना सरवदे तसेच सदस्यांनी स्वागत केले. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत, कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री काही बोलतील, अशी शेतकऱ्यांमधून शक्यता व्यक्त होत होती. मात्र राज्यातील कोणत्याच प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांनी कुलदेवताच्या प्रांगणात भाष्य केले नाही.विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस प्रथमच इंदापूर तालुक्यात येत असल्याने या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

श्री. फडणवीस यांचे हेलिकॉप्टरने नीरा- नरसिंहपूर येथे आगमन झाल्यानंतर हेलिपॅडवरच माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते हर्षवर्धन पाटील व इंदापूर चे माजी सभापती विलास वाघमोडे यांनी श्री. फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी फडणवीस यांचा तुळशीहार घालून , विठ्ठलाची मूर्ती सप्रेम भेट देऊन त्यांनी सत्कार केला. विठ्ठलाच्या साक्षीनं फडणवीस यांच्या कुलदैवताच्या आवारात श्री. पाटील यांनी घेतलेल्या भेटीची बराच काळ चर्चा सुरू होती. या भेटी दरम्यान त्यांची काही चर्चा झाली किंवा कसे याबाबत काही तपशील मिळू शकला नाही. मात्र ,श्री .पाटील यांनी फडणवीस यांची घेतलेली भेट चर्चेचा विषय ठरली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान हर्षवर्धन पाटील यांनी भारतीय जनता पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटामध्ये प्रवेश करून इंदापूर विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवली. तत्पूर्वी इंदापूर तालुक्यात निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी श्री .फडणवीस यांनी इंदापूर मध्ये कार्यकर्त्यांचा मोठा मेळावा घेऊन, त्या मेळाव्यामध्ये इंदापूर तालुका आम्ही दत्तक घेत आहोत. इंदापूरला कधी वाऱ्यावर सोडणार नाही. अशी स्पष्ट ग्वाहीही दिली होती.

यावेळी काही तोडगा निघून विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवारा बरोबर श्री. पाटील दिसतील अशी शक्यता वर्तवण्यात आली होती.मात्र, श्री. पाटील यांनी भारतीय जनता पक्ष व महायुती सोडत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात जाहीर प्रवेश करून महाविकास आघाडीची उमेदवारीही मिळवली. आणि श्री. पाटील यांनी महायुतीचे उमेदवार दत्तात्रय भरणे यांना लढत दिली. मात्र, अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीत तिरंगी लढतीला श्री. पाटील यांना सामना करावा लागला.त्यात पाटील यांचा पराभव झाला. त्यानंतर राज्यामध्ये पुन्हा महायुतीचे सरकार सत्तेत आले. मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस विराजमान झाल्यानंतर प्रथमच आपल्या कुलदैवताच्या दर्शनासाठी इंदापूर तालुक्यात आले होते.

### ट्रस्टच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार

मुख्यमंत्र्यांनी श्री. क्षेत्र नीरा नरसिंहपूर विकास आराखड्यातील कामांच्या प्रगतीची अधिकाऱ्यांकडून व विश्वस्तांकडून माहिती घेतली. देवस्थान ट्रस्टच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या वतीने सरपंच अर्चना सरवदे तसेच सदस्यांनी स्वागत केले. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत, कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री काही बोलतील.

# पुण्याच्या रस्त्यावर नवीन वाहने धावणार!

## गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 28 टक्क्यांनी वाहने वाढली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढी पाडवा सणाच्या मुहूर्तावर पुणे शहरात तब्बल १० हजार १७० वाहनांची खरेदी झाली. यामध्ये सर्वाधिक सहा हजार ५१० दुचाकी, तर दोन हजार ४२४ चारचाकी वाहनांचा समावेश आहे. विशेष म्हणजे नवीन वाहन खरेदीकडे गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा तब्बल अडीच हजारांहून अधिक (२८ टक्के) वाढ पुणे शहर उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) नोंदवली.**



गेल्या वर्षी (२०२४ ) गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर सात हजार ३३६ वाहनांची नोंदणी झाली होती, तर २०२३ मध्ये, पाडव्याच्या मुहूर्तावर सात हजार ७०६ वाहनांची नोंदणी झाली.दरवर्षी गुढी पाडवा, अक्षय्य तृतीया, दसरा हे तीन आणि दिवाळी पाडवा अर्ध महुर्त अशा साडेतीन मुहूर्तावर गृह, सोने किंवा वाहन खरेदी केली जाते. प्रत्येकाला एकाच मुहूर्तावर खरेदी करायची असल्याने बाजारात उत्पादक कंपन्यांकडूनही आगाऊ आरक्षण करून घेण्यात येते. त्यानुसार यंदा वाहन खरेदीकडे नागरिकांचा कल वाढला असल्याचे दिसून येते. यंदाच्या वर्षी देखील वाहन खरेदी वाढ होत असून यंदा विक्रमी वाहन खरेदी झाली आहे. पाडव्याचा मुहूर्त आणि वाहनांची प्रतीक्षा यामुळे खरेदीदारांनी महिनाभरापूर्वीच वाहनांची नोंदणी करून ठेवली. त्यानुसार वाहन खरेदीची प्रक्रिया निश्चित केल्यानंतर आरटीओ'तून नोंदणी क्रमांक आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वाहन विक्री केंद्रांतून पाठविलेल्या अर्जानुसार १० हजार १७० कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे, असे आरटीओ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. विशेषत: पर्यावरणपूरक आणि कमी खर्चीक असलेल्या इलेक्ट्रीक, सीएनजी तसेच एमएनजीएल अशी वेगवेगळी वाहने असून निरनिराळ्या उत्पादक कंपन्यांनी पर्याय उपलब्ध करून दिल्याने आपसूकच नागरिकांचा कल अशा वाहनांकडे कल वाढला आहे.

### यंदा सहा हजार 510 दुचाकी खरेदी

त्यामुळे वाहनखरेदीला चालना मिळत ग्राया वाहनांना पसंती दिल्याचे आरटीओ प्रशासनाकडून सांगण्यात आले.पुणेकरांचा दुचाकी वाहनांसाठी सर्वाधिक कल आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा दोन हजार २२९ दुचाकी जास्त खरेदी करण्यात आल्या आहेत. २०२४ मध्ये पाडव्याला चार हजार २२१ दुचाकी खरेदी करण्यात आल्या होत्या, तर यंदा सहा हजार ५१० दुचाकी खरेदी करण्यात आली आहे.

## शौय-राष्ट्रभक्तीचे प्रतिक 200 फूट उंच

# भगवा ध्वज पिंपरी-चिचवडमध्ये दिमाखात फडकणार!

### गुढीपाडव्याच्या निमित्ताने शिवप्रेमी, ग्रामस्थांच्या उपस्थितीत भूमिपूजन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भगवा ध्वज अखंड हिंदुस्थान, शौर्य, त्याग, बलिदान आणि स्वामिनाचे प्रतिक आहे. प्रभू श्रीरामांची, वैष्णव बांधवांची विद्वत्ता, महानता सांगणारे हिंदू धर्माचे निशाण आणि वारकरी सांप्रदायाची पताका आहे, असा भगवा ध्वज पिंपरी-चिंचवड शहरात दिमाखात व अभिमानाने फडकला पाहिजे, अशी समस्त वैष्णव बांधव, हिंदुत्ववादी संघटना, शिवशंभु प्रेमींची इच्छा होती. अखेर गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर या मागणीला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून, चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ २०० फूट उंच भगवा ध्वज प्रत्येकाला हिंदू संस्कृतीचा, हिंदुत्ववादी जाज्वल्य अभिमानाचा संदेश देत राहील, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.**



चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ २०० फुटी उंच भगवा ध्वज उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायातील विविध मान्यवर, थोरल्या पादुका मंदिर समितीचे पदाधिकारी, भाजपचे पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते




आमदार महेश लांडगे म्हणाले की, महाराष्ट्रातील लाखो वारकरी देहू-आळंदी-पंढरपूर पालखीमार्गावरून वारी करतात. या मार्गावर चऱ्होलीतील थोरल्या पादुका मंदिराजवळ संतसृष्टी उभारण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून या भक्ती मार्गावर वारकरी आणि हिंदू धर्माचे पवित्र निशाण असलेला भगवा ध्वज उभारला जात आहे. पिंपरी-चिंचवड शहराला संत परंपरा आणि वारकरी सांप्रदायाची विशाल परंपरा आहे. आळंदीतून दरवर्षी वैष्णवांचा मेळा पांडुरंगाच्या नामस्मरणाचा जयघोष करत पंढरपूरकडे मार्गक्रमण करतो. या पालखी महामार्गावर वैष्णवांच्या भक्तीसोबत हिंदुत्वाचे भगवे निशान फडकले जावे, अशी संकल्पना मांडली होती. त्यासाठी पाठपुरावा सुरू केला गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर या संकल्पनेला मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे.

> “ भारतीय हिंदू संस्कृतीची महिती सांगणारा त्याग, बलिदान, शौर्य आणि जाज्वल्य राष्ट्रभक्तीचे प्रतिक म्हणजे भगवा... भोसरी विधानसभा मतदार संघात सर्वांत उंच भगवा ध्वज थोरल्या पादूक मंदिर, चऱ्होली येथे उभारला जात आहे. हिंदू नववर्ष गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाच्या निमित्ताने हा राष्ट्र-धर्मकार्य करताना आम्हाला विशेष अभिमान आणि आनंद वाटतो. श्रीक्षेत्र देहू-आळंदी-पंढरपूर पालखी महामार्गावर थोरल्या पादुका मंदिरासमोर २०० फूट भगवा ध्वज उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन सहकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. समस्त शिव-शंभू प्रेमी, हिंदूत्ववादी तसेच वैष्णव बांधवांचे मोठे स्वप्न साकारते आहे. यापुढील पिढ्यान पिढ्या हा ध्वज राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रधर्मासह शिवधर्माचे विचार अभिमानाने फडकवत राहील, असा विश्वास वाटतो.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## आधुनिक काळात कुटुंब व्यवस्था धोक्यात

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांचे प्रतिपादन

। चऱ्होली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




एक हजार वर्षांच्या परकीय आक्रमणात अनेक राज्ये, मंदिरे आणि विद्यापीठे उध्वस्त झाली. परंतू, भारतीय जिवनमुल्यांचा आधार असलेल्या कुटुंब व्यवस्थेला आक्रमक हात लावू शकले नाहीत. आज मात्र आधुनिक युगात सर्व सुख सुविधा असतानाही भारतीय कुटुंब व्यवस्था डळमळीत होत असून, राष्ट्रहितासाठी ही धोक्याची घंटा आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड येथील संघाच्या चऱ्होली नगराच्या वर्षप्रतिपदा उत्सवात ते बोलत होते. डूडूळगाव येथील संत सावतामाळी मंदिर प्रांगणात पार पडलेल्या उत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून आळंदी शहर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सतीश चोरडिया, जिल्हा संघचालक विनोद बन्सल, नगर कार्यवाह नारायण बांगर उपस्थित होते. कुटुंब टिकले तर राष्ट्र टिकेल, असे प्रतिपादन करताना सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे म्हणाले, “नैतिक मुल्यांच्या आधारे उभी राहिलेली भारतीय कुटुंब व्यवस्था ही जगातील सर्वश्रेष्ठ प्रणाली आहे. संस्कार, संस्कृती, सेवाभाव आणि आत्मियता असलेले कुटुंबव्यवस्था राष्ट्रालाही सक्षम करते. आपल्या कुटुंबात ‘मातृ-पितृ देवो भव:’ या भावाचे आचरण व्हायला पाहिजे. आधुनिक युगात कुटुंब व्यवस्था टिकविण्यासाठी प्रत्येक सदस्याने प्रयत्न करायला हवेत.” व्यक्तीगत आणि राष्ट्रीय चारित्र्याच्या विकासातून श्रेष्ठ भारत निर्माण होईल, असेही होसबाळे म्हणाले.

#### हिंदू समाजात जातीभेदाला स्थान नाही

सर्वांमध्ये ईश्वरी अंश असल्याचे आपला धर्म सागतो. कोणत्याही धर्मग्रंथात जातीच्या आधारावर भेदभावाला स्थान नाही. संत आणि महापुरूषांनी तर जातीभेदाला विरोध केला. असे असतानाही समाजात जातीच्या आधारावर भेदभाव होत असेल, तर तो आपल्यासाठी कलंक आहे. हिंदू समाजाने आता जातीभेदाला दूर लोटले पाहिजे, असे परखड मत दत्तात्रेय होसबाळे यांनी व्यक्त केले. तसेच नागरिकांनी हक्कांबरोबरच कर्तव्याचेही पालन करायला हवे. भारताला श्रेष्ठ बनवायचे असेल तर समाजानेच पुढे यायला हवे, असे आवाहनही त्यांनी केले.




# कुणाल कामराचे काय करणार?

**अडीच वर्षांची एकत्र सत्ता, निवडणुकीत मिळवलेला ऐतिहासिक विजय यामुळेदेखील जे साध्य होऊ शकले नाही, ते कुणाल कामरा याने करून दाखवले. यासाठी बाकी कोणी नाही तरी निदान एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने कुणाल कामरा या विनोदकाराचे आभार मानायला हवेत. पण झाले उलटेच.**



या मंडळींनी कुणालच्या कार्यक्रमाचे चित्रीकरण झाले त्या स्टुडिओवर हल्ला केला आणि आपण खरी शिवसेना खरोखरच आहोत हे सिद्ध करण्याच्या केविलवाण्या प्रयत्नात तेथे मोडतोड केली. वास्तविक शिंदे यांच्या शिवसेनेने कुणालचे खासगीत का असेना अभिनंदन करायला हवे. कदाचित त्यांना कुणालचा विनोद लक्षात आला नसावा. त्यात त्यांची चूक तशी नाही. शिवसेना संस्थापक दस्तुरखुद्द बाळासाहेब ठाकरे, त्यांचे चिरंजीव उद्धव ठाकरे, पुतणे राज ठाकरे हे तीन 'सन्माननीय' अपवाद वगळता अन्य कोणास त्या पक्षात विनोद कळणे तसे अंमळ अवघडच. या तिघांनी(च) विनोद करायचे आणि ते हसल्यावर(च) अन्यांनी हसायचे अशी प्रथा असल्याने 'हा विनोद आहे; आता हसा' असा आदेश 'मातोश्री'वरून येईपर्यंत अन्य सैनिकांस हसण्याची मुभा नव्हती. त्यामुळे कुणालचा विनोद त्यांस कळला नसला तर त्यांस बोल लावता येणार नाही. हे वाचल्यावर यात आदित्य ठाकरे यांचा उल्लेख का नाही, असा प्रश्न काहींस पडेल. त्याचे कारण त्यांना केवळ इंग्रजी विनोद कळतो म्हणून त्यांची गणना अन्य ठाकऱ्यांत नाही. असो. आता शिंदे यांच्या सेनेने कुणाल कामरा यांचे आभार का मानायला हवेत, हा प्रश्न.याचे स्पष्ट कारण असे की कुणालमुळे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर भर मैदानात, सर्वासमक्ष उतरून शिंदे यांचा जाहीर बचाव करण्याची वेळ आली. ज्या कृत्याची प्रतीक्षा शिंदे आणि त्यांच्या साजिंद्यांना इतका काळ होती ते कृत्य एका य:कश्चित विनोदकारामुळे फडणवीस यांस करावे लागले. त्यामुळे खरे तर शिंदे यांच्यापेक्षा फडणवीस यांनी कुणालवर संतापायला हवे. मनात नाही ते करावयास लावले यासाठी फडणवीस आणि त्यांच्या भाजप समर्थकांनी कुणालवर चाल करून जायला हवे. पण झाले उलटेच. शिंदे यांच्या साजिंद्यांप्रमाणे फडणवीस यांच्या खंद्या समर्थकांचाही कुणालने केलेला विनोद आणि त्यामुळे फडणवीस यांनी हिरिरीने केलेला शिंदे यांचा बचाव हे पाहून गोंधळ उडाला. म्हणून ते गप्प राहिले. शिंदे यांच्या साजिंद्यांच्या सुरात सूर मिसळत बडबड करते झाले ते प्रसाद लाडसदृश नव आणि सोयीस्कर हिंदुत्ववादी नेते. ती त्या बिचाऱ्यांची गरज. एक तर भाजपमध्ये या अशांना कोणी विचारत नाही आणि जे एके काळी विचारत ते देवेंद्र फडणवीस आता त्यांच्याकडे पाहतही नाहीत. त्यामुळे अशी काही संधी मिळाली की राजापेक्षा राजनिष्ठ असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न हे करणार हे ओघाने आले. शिवाय फडणवीस यांच्या सुरात सूर मिसळताना शिंदे यांसही नेत्रपल्लवी करण्याची संधी मिळते, हा फायदा आहेच. तेव्हा या मंडळींच्या कुणालक्रोधामागील खरे कारण हे! त्याच वेळी एकनाथ शिंदे यांचे सह-उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी घेतलेल्या भूमिकेचेही खरे तर कौतुक करायला हवे. अजितदादा म्हणाले : "कोणीही कायद्याचे उल्लंघन करू नये आणि घटनेने दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेत राहून बोलावे." पवार घराण्यातील सर्वांस आपसूक येते ते चातुर्य हे! अजितदादा जे बोलले ते बोलण्यासाठी कुणाल कामराच्या विनोदाची गरज काय? त्यांनी केले ते विधान सार्वत्रिक सर्वकालीन आहे. पण जेव्हा स्पष्टतेची गरज असते तेव्हाच सरधोपट काही बोलायचे हीच राजकारणातील पवार आडनावाची खासियत.कारण याच विधानात तर कुणालचे काय करायचे या प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे. अजितदादा म्हणतात त्याप्रमाणे त्याने घटनाभंग केला आहे काय? असंसदीय शब्द उच्चारले आहेत काय? या प्रश्नांचे खरे उत्तर देता येणे अवघड. ते 'हो' असे द्यावे तर घटनाभंग काय हे सांगावे लागेल आणि नाही असे द्यावे तर कुणालचे समर्थन करावे लागेल. अजितदादा अत्यंत चातुर्याने हे दोन्हीही करणे टाळतात. याखेरीज टीका करणे यास आक्षेप घ्यावा तर कुणालपेक्षाही अधिक कडवट टीका राज ठाकरे यांनी अवघ्या २४ तासांपूर्वी केली; त्याची दखल घेणे आले.

## प्रासंगिक »

### बालिश बाहुबली

***'सिग्नलगेट'सारखी आगळीक घडते ती व्यवस्था आणि जबाबदारीप्रति ट्रम्प आणि त्यांच्या सहकारी, सोयऱ्यांमध्ये गांभीर्यच नसल्यामुळे...***

राज्यशकट हाकणे ही गंभीर बाब असते. मोठ्या देशाचा गाडा हाकणे हे तर अधिक गंभीर. महासत्तेचा कारभार तर गंभीरात गंभीर. पण हे गांभीर्य नको तेथे नको तितके दाखवले गेले नि हवे तेव्हा व तेथे आढळून आले नाही, की काय होते हे अमेरिकेत नुकत्याच घडलेल्या प्रकाराने दाखवून दिले. डोनाल्ड ट्रम्प यांनी तिसऱ्यांदा अमेरिकी अध्यक्षपदाची निवडणूक लढवली नि ते दुसऱ्यांदा या पदावर निवडून आले.

त्यांनी या अत्यंत महत्त्वाच्या पदावर एक कार्यकाळ व्यतीत केलेला आहे. तेव्हा अध्यक्ष म्हणून अमेरिकेचा कारभार चालवण्याचा त्यांना चार वर्षांचा अनुभव आहे. पण त्या वेळी जसे ते मनाने वॉशिंग्टनमध्ये कमी आणि फ्लोरिडातील त्यांच्या मौजप्रासादातील मेजवान्यांमध्ये आणि प्रासाद परिसरात गोल्फ खेळण्यात अधिक रमायचे, तसेच आताचे चित्र आहे.

आपल्या लोकशाहीचा पाया ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात सध्या जनतेचा काडीचाही सहभाग राहिलेला नाही.राज्यघटनेत ७२ आणि ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार आपण स्थानिक कारभार जनतेच्या सहभागातून करण्याचा निर्णय घेतला पण महाराष्ट्रातील ही लोकशाही आता मृतप्राय झाली आहे.

## महापालिका निवडणुका नकोत



राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ट असल्याने, राज्यातल्या मुंबईसह २७ महानगरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समितीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरू आहे. यामुळे राज्यातील सर्व जिल्हा परिषदा आणि महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक नेतृत्व मुळासकट उपटून टाकण्यात येत आहे आणि त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य कार्यकर्ते हवालदिल झाले आहेत. राज्यात शासन आणि प्रशासन यातील कामकाजाचा अनुभव घेऊन नेतृत्व विकसित करण्याच्या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्था अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. पण वर्षानुवर्षे त्यांच्या निवडणुका न झाल्याने राजकीय पक्षांचे आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते हवालदिल झाले आहेत. या कार्यकर्त्यांना कोणी वाली राहिला नाही अशी स्थिती आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांनी तळागाळात झोकून देऊन काम केले. आगामी काळात होणाऱ्या पालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार असल्याने आपल्या राजकीय भवितव्याचे गणित मांडून कार्यकर्त्यांनी काही आखणी केली पण त्याबाबत आता काही होणार नसल्याचे चित्र सतत दिसत आहे.राज्यातील मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण – डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई- विरार, मिरा-भाईंदर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी या प्रमुख महापालिका आणि सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका गेल्या तीन वर्षांपासून रखडल्या आहेत. राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या निवडणुका दोन ते चार वर्षांपासून रखडलेल्या आहेत. यामध्ये नव्याने निर्माण झालेल्या जालना व इचलकरंजी या महापालिकेची अद्याप एकही निवडणूक झालेली नाही. त्याच वेळी कोल्हापूर महानगरपालिकेची मुदत १५ नोव्हेंबर, छत्रपती संभाजीनगर महापालिकेची मुदत २९ एप्रिल तर नवी मुंबई महापालिकेची मुदत ७ मे २०२० पासून संपल्यामुळे त्यावेळेपासून म्हणजेच करोना काळाच्या आधीपासून गेल्या जवळपास पाच वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. राज्यातल्या सर्वात श्रीमंत असणाऱ्या मुंबई महापालिकेची मुदत संपूनही आता दोन वर्षांहून अधिकचा कालावधी उलटला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# औरंगजेबाची सजवलेली कबर काढा!

## राज ठाकरे यांनी केली उत्तर प्रदेशातील महाकुंभमेळ्यावर टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा आज मुंबईत मेळावा पार पडला. या मेळाव्याच्या माध्यमातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील विविध विषयांवर भाष्य केलं. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्यासह महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या औरंगजेबाच्या कबरीच्या वादावर राज ठाकरे यांनी मोठं भाष्य केलं आहे. 'औरंगजेबाची सजवलेली कबर काढून तेथे एक बोर्ड लावा की मराठ्यांना संपवायाला आलेला औरंगजेब येथे गाडला गेला', असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.**



औरंगजेबाचं राज्य कुठपासून कुठपर्यंत होतं? आफगाणिस्तानपासून दक्षिणेपर्यंत. छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा आग्र्यावरून महाराष्ट्रात परत आले, राज्याभिषेक झाला आणि काही काळानंतर महाराजांचं निधन झालं. या दरम्यानच्या काळात औरंगजेबाचा एक मुलगा दक्षिणेत आला. त्या औरंगजेबाच्या मुलाला छत्रपती संभाजीराजे यांनी जागा दिली म्हणजे शह दिला. १६८१ ते १७०७ म्हणजे २७ वर्ष औरंगजेब महाराष्ट्रात लढत होता. छत्रपती संभाजीराजे यांच्याबरोबर औरंगजेब लढला. त्यांना क्रूर पद्धतीने मारलं. राजाराम महाराज, संताजी धनाजी, ताराराणी साहेब लढल्या. एका पुस्तकात एक फार चांगलं वाक्य आहे. मराठे सर्व लढाया हारत होते, पण औरंगजेब एकही लढाई जिंकू शकत नव्हता", असं राज ठाकरे म्हणाले.औरंगजेबाने तेव्हा परत जायला पाहिजे होतं. मात्र, एवढ्या मोठ्या बलाढ्य प्रदेशाचा राजा महाराष्ट्रात ठाण मांडून का बसला होता? कारण औरंगजेबाला शिवाजी नावाचा विचार मारायचा होता. पण हे औरंगजेबाला जमलं नाही, सर्व प्रयत्न केले आणि शेवटी औरंगजेब येथेच मेला. जगाच्या इतिहासात औरंगजेब वाचला जातो. तेव्हा जगभरातील लोकांना कळतं की औरंगजेब काय करायला गेला होता आणि कसा मेला. तेव्हा तेथे जगभरात छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव येतं", असंही राज ठाकरे म्हणाले.औरंगजेबाच्या कबरीबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले की, "औरंगजेबाची सध्याची सजवलेली कबर काढून टाका. तेथे फक्त कबर दिसली पाहिजे आणि त्या ठिकाणी एक मोठा बोर्ड लावा. आम्हा मराठ्यांना संपवायाला आलेला औरंगजेब येथे गाडला गेला. हा आमचा इतिहास आहे", असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.सध्या परिस्थितीत मूळ विषयांकडे कोणाचंही लक्षच नाही. सर्व विषय भरकटले जातात. आम्हाला जंगलाचं पडलेलं नाही, पाण्याचं पडलेलं नाही. आम्हाला फक्त पडलेलं आहे औरंगजेबाचं. तो बसलाय द्राक्ष खात आणि आम्ही भांडतोय. औरंगजेबाची कबर राहिली पाहिजे की पाडली पाहिजे? हे विषय आत्ताच कसे आले? चित्रपटाने जागे होणारे हिंदू काहीही कामाचे नाहीत. चित्रपट उतरला की हे उतरले. छत्रपती संभाजी महाराजांचं बलिदान तुम्हाला आता कळलं का? अक्षय खन्ना चित्रपटात औरंगजेब बनून आल्यानंतर तुम्हाला औरंगजेब कळायला लागला का? हॉट्सॲपवर तुम्हाला इतिहास कळत नाही. त्यासाठी तुम्हाला पुस्तकं वाचायला लागतात. आता इतिहासावर कोणीही बोलायला लागलं आहे. विधानसभेतही औरंगजेबावर बोलतात", असं म्हणत राज ठाकरे यांनी टीका केली. राज ठाकरेंनी मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात घणघाती भाषण केलं. औरंगजेबाची कबर, महापालिका निवडणुका, लाडकी बहीण योजना यांसह त्यांनी विविध मुद्द्यांना स्पर्श केला. दरम्यान बीडच्या संतोष देशमुख हत्या प्रकरणाचाही उल्लेख राज ठाकरेंनी केला.९ डिसेंबर २०२४ या दिवशी संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली.

### तर कानफटीतच बसणार

हिवाळी अधिवेशन आणि त्यानंतर नुकतंच पार पडलेलं अर्थसंकल्पीय अधिवेशन यांमध्ये हा विषय चर्चेला आला होता. तसंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटोही व्हायरल झाले. या प्रकरणात संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एक आरोपी वगळून इतर सगळ्यांना अटक झाली. तसं वाल्मिक कराड हा या खंडणी प्रकरणाचा मास्टरमाईंड असल्याचंही समोर आलं. संतोष देशमुखांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. बीडच्या विंड मिलच्या राजकारणातून ही हत्या झाली. किती घाणेरड्या प्रकारे मारावं. तुमच्या अंगात नसानसात एवढी क्रूरता असेल तर मी दाखवेन जागा, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# बाळासाहेब ठाकरेंचा उत्तराधिकारी कोण?

## राज ठाकरे की एकनाथ शिंदे? नितीन गडकरे यांनी दिले उत्तर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**बाळासाहेब ठाकरेंचा उत्तराधिकारी कोण या प्रश्नाचं आता नितीन गडकरी यांनी उत्तर दिलं आहे. बाळासाहेब ठाकरे यांना हिंदूहृदय सम्राट असं म्हटलं जात होतं. तसंच उद्धव ठाकरे हे त्यांचे पुत्र आहेत. मात्र उद्धव ठाकरेंनी शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली म्हणत एकनाथ शिंदेंनी उठाव केला. तर राज ठाकरे हे मी बाळासाहेबांचा वैचारिक वारसदार आहेत असं सांगत असतात. दरम्यान नितीन गडकरी यांनी आता या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे.**



महाराष्ट्राच्या राजकारणात जून २०२२ मध्ये शिवसेनेत सर्वात मोठं बंड झालं. एकनाथ शिंदे ४० आमदारांसह शिवसेनेतून बाहेर पडले आणि त्यांनी थेट पक्ष नेतृत्वाला म्हणजेच शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनाच आव्हान दिलं. त्यानंतर एकनाथ शिंदे भाजपाच्या पाठिंब्यावर अडीच वर्षे मुख्यमंत्री होते. निवडणूक आयोगाने त्यांना शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्हंही दिलं. महाविकास आघाडीचा प्रयोग म्हणजेच काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांची सत्ता महाराष्ट्रात अडीच वर्षे होती. मात्र ही महाविकास आघाडी मान्य नसलेल्या एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली. त्यानंतर राज्यात जी विधानसभा निवडणूक नुकतीच पार पडली त्या निवडणुकीत एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजपा यांच्या पक्षांना म्हणजेच महायुतीला २३७ जागा मिळाल्या. दरम्यान बाळासाहेबांचे विचार घेऊन मी बाहेर पडलो असं एकनाथ शिंदे सांगतात. तर राज ठाकरे हे मी बाळासाहेबांचा वैचारिक वारसदार आहे असं म्हणाले होते. तर शिवसेना एकच आहे आणि ती माझ्या वडिलांनी स्थापन केलेली शिवसेना हे उद्धव ठाकरे कायमच म्हणतात. दरम्यान बाळासाहेबांचा उत्तराधिकारी कोण? यावर नितीन गडकरी यांनी आता भाष्य केलं आहे.

बाळासाहेब ठाकरेंचं माझ्यावर खूप प्रेम होतं. तसंच राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या तिघांशीही माझे चांगले संबंध आहेत. कोण उत्तराधिकारी आहे हे तर मी सांगू शकत नाही ते जनताच ठरवेल. माझे सगळ्यांशी चांगले संबंध आहे. राजकारण बदलत जातं पण मैत्री संपत नसते. बाळासाहेबांचं माझ्यावर खूप प्रेम होतं. राज आणि उद्धव ठाकरेंशी माझे चांगले संबंध आहेत.

एकनाथ शिंदे यांच्याशीही माझे चांगले संबंध आहेत. आता बाळासाहेबांचा उत्तराधिकारी कोण हे जनतेला ठरवू द्या असं नितीन गडकरींनी म्हटलं आहे. यानंतर हिंदूहृदय सम्राट कोण? असाही प्रश्न नितीन गडकरींना विचारण्यात आला.

### हिंदूहृदयसम्राट नेमकं कोण?

यानंतर हिंदूहृदय सम्राट कोण? असाही प्रश्न नितीन गडकरींना विचारण्यात आला. तसंच बाळासाहेब ठाकरे, लालकृष्ण आडवाणी, अशोक सिंघल असे तीन पर्याय देण्यात आले. त्यावर नितीन गडकरी म्हणाले हे तिघंही हिंदूहृदय सम्राट आहेत. तिघांनी देशाच्या अस्मितेसासाठी आणि हिंदुत्वासाठी योगदान दिलं आहे असंही नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.

# ओडिशा राज्यात पुन्हा एकदा रेल्वेचा अपघात

## कामाख्या एक्स्प्रेसचे 11 डबे रुळावरून घसरले; 8 जण जखमी

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ओडिशा राज्यात पुन्हा एकदा एका रेल्वेचा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. कामाख्या एक्स्प्रेसचे ११ डबे रुळावरून घसरल्याची माहिती सांगितली जात आहे. ओडिशातील कटकजवळील नेरगुंडी रेल्वे स्टेशनजवळ बेंगळुरू-कामाख्या सुपरफास्ट एक्स्प्रेसचे ११ डबे रुळावरून घसरले आहेत. रविवारी सकाळी ११.५४ वाजता ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.**



या घटनेनंतर प्रवाशांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली होती. ही घटना घडल्यानंतर रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. तसेच प्रशासनाकडून मदतकार्य सुरु करण्यात आल्याचंही सांगितलं जात आहे. या घटनेनंतर अपघात मदत आणि वैद्यकीय मदत रेल्वे देखील घटनास्थळी रवाना करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. दरम्यान, कामाख्या एक्स्प्रेसचे ११ डबे रुळावरून घसरल्याच्या या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून ८ जण जखमी झाल्याची माहिती सांगितली जात आहे. तसेच कामाख्या एक्स्प्रेस रेल्वे रुळावरून घसरल्यामुळे अनेक एक्स्प्रेसचे मार्ग वळवण्यात आले आहेत. कामाख्या एक्स्प्रेसमधील प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच कामाख्या एक्स्प्रेस पुन्हा धावण्यासाठी योग्य दुरुस्तीचं काम सुरू असल्याचंही ईसीओआर अधिकाऱ्यांनी सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे.या घटनेबाबत ईस्ट कोस्ट रेल्वेचे सीपीआरओ अशोक कुमार मिश्रा यांनी सांगितलं की, "आम्हाला कामाख्या सुपरफास्ट एक्स्प्रेसचे काही डबे रुळावरून घसरल्याची माहिती मिळाली आहे. ११ एसी डबे रुळावरून घसरले आहेत.

सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. आम्हाला माहिती मिळाल्यानुसार, अपघात निवारण गाड्या, आपत्कालीन वैद्यकीय उपकरणे पाठवण्यात आली आहेत. या बरोबरच जीएम/ईसीओआर आणि इतर उच्चस्तरीय अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. तसेच या अपघाताचे कारण चौकशीनंतर समोर येईल. त्या मार्गावर थांबलेल्या गाड्या वळवणे आणि पूर्ववत काम सुरू करणे हे आमचं पहिलं प्राधान्य आहे."ओडिशा राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी याआधीही काही रेल्वे अपघाताच्या घटना घडल्या आहेत. गेल्या वर्षी भुवनेश्वरजवळ मालगाडी रुळावरून घसरली होती. पण त्या अपघात कोणतीही जीवितहानी झाली नव्हती. तसेच ओडिशात २०२३ मध्ये एक मोठा रेल्वे अपघात झाला होता. तीन गाड्या एकमेकांवर आदळल्या होत्या. यामध्ये शालिमार-चेन्नई कोरोमंडल एक्स्प्रेस, बेंगळुरू-हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेस आणि मालगाडीचा समावेश होता. त्यामध्ये अनेकांचा मृत्यू झाला होता.या घटनेनंतर प्रवाशांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली होती. ही घटना घडल्यानंतर रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. तसेच प्रशासनाकडून मदतकार्य सुरु करण्यात आल्याचंही सांगितलं जात आहे. या घटनेनंतर अपघात मदत आणि वैद्यकीय मदत रेल्वे देखील घटनास्थळी रवाना करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. दरम्यान, कामाख्या एक्स्प्रेसचे ११ डबे रुळावरून घसरल्याच्या या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून ८ जण जखमी झाल्याची माहिती सांगितली जात आहे.कामाख्या एक्स्प्रेसमधील प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच कामाख्या एक्स्प्रेस पुन्हा धावण्यासाठी योग्य दुरुस्तीचं काम सुरू असल्याचंही ईसीओआर अधिकाऱ्यांनी सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

### सर्व प्रवासी सुरक्षित

या घटनेबाबत ईस्ट कोस्ट रेल्वेचे सीपीआरओ अशोक कुमार मिश्रा यांनी सांगितलं की, "आम्हाला कामाख्या सुपरफास्ट एक्स्प्रेसचे काही डबे रुळावरून घसरल्याची माहिती मिळाली आहे. ११ एसी डबे रुळावरून घसरले आहेत. सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. आम्हाला माहिती मिळाल्यानुसार, अपघात निवारण गाड्या, आपत्कालीन वैद्यकीय उपकरणे पाठवण्यात आली आहेत. या बरोबरच जीएम/ईसीओआर आणि इतर उच्चस्तरीय अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. तसेच या अपघाताचे कारण चौकशीनंतर समोर येईल. त्या मार्गावर थांबलेल्या गाड्या वळवणे आणि पूर्ववत काम सुरू करणे हे आमचं पहिलं प्राधान्य आहे.

# इंडिगो कंपनीला आयकर विभागाचा दणका

## ठोठावला 944 कोटींचा दंड, आदेशाला देणार कायदेशीर आव्हान?

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशातील सर्वात मोठी एअरलाइन्स कंपनी असलेल्या इंडिगोला आयकर विभागाने दणका दिला आहे. इंडिगोची मूळ कंपनी असलेल्या इंटरग्लोब एव्हिएशनला आयकर विभागाने तब्बल ९४४.२० कोटींचा दंड ठोठावल्याचा आदेश जारी केला असल्याची माहिती समोर आली आहे. आयकर विभागाने या संदर्भातील नोटीस कंपनीला पाठवली असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, आयकर विभागाच्या या आदेशाला कंपनीने चुकीचं म्हटलं असून या आदेशाला कायदेशीर आव्हान देण्यात येणार असल्याचं कंपनीने म्हटलं आहे.**




एअरलाइन्स इंडिगोची मूळ कंपनी इंटरग्लोब एव्हिएशन लिमिटेडने रविवारी या संदर्भात माहिती देताना सांगितलं की, त्यांना २०२१-२२ या कर निर्धारण वर्षासाठी आयकर विभागाने ९४४.२० कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आल्याची नोटीस आली आहे. मात्र, आयकर विभागाच्या या आदेशाला आव्हान देण्यासाठी कायदेशीर उपाययोजना केल्या जातील, असं एव्हिएशन लिमिटेडने स्पष्ट केलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.तसेच आयकर विभागाच्या या आदेशाचा एअरलाइनच्या कामकाजावर आर्थिक किंवा इतर कामांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचंही कंपनीने स्पष्ट केलं आहे. या संदर्भात एअरलाइनने एका निवेदनात म्हटलं की, "आयकर प्राधिकरणाने २०२१-२२ या करनिर्धारण वर्षासाठी ९४४.२० कोटी रुपयांचा दंड आकारला आहे. दरम्यान, कलम १४३(३) अंतर्गत करनिर्धारण आदेशाविरुद्ध आयकर आयुक्त यांच्यासमोर कंपनीने दाखल केलेलं अपील फेटाळण्यात आलं, तसेच ते अद्याप प्रलंबित आहे. पण चुकीच्या समजुतीच्या आधारे हा आदेश पारित करण्यात आला असल्याचं कंपनीने म्हटलं आहे. दरम्यान, कंपनीने या दाव्याचे खंडन करताना म्हटलं की, "हा निर्णय चुकीच्या समजुतीवर आधारित आहे, त्यात कायदेशीर वैधता नाही. पण तरीही एअरलाइन योग्य त्या कायदेशीर मार्गांनी या आदेशाला आव्हान देईल. तसेच आमचा न्यायालयीन प्रक्रियेवरील विश्वास असून आयकर विभागाने दिलेला आदेश कायद्यानुसार नसल्याचं म्हटलं आहे.इंडिगोच्या शेअर्स ०.३२ टक्क्यांनी घसरून ५,११३ रुपयांवर स्थिरावले आहेत. एअरलाइन्स इंडिगोची मूळ कंपनी इंटरग्लोब एव्हिएशन लिमिटेडने रविवारी या संदर्भात माहिती देताना सांगितलं की, त्यांना २०२१-२२ या कर निर्धारण वर्षासाठी आयकर विभागाने ९४४.२० कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आल्याची नोटीस आली आहे.

### कायदेशीर उपाययोजना केल्या

आयकर विभागाच्या या आदेशाला आव्हान देण्यासाठी कायदेशीर उपाययोजना केल्या जातील, असं एव्हिएशन लिमिटेडने स्पष्ट केलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.तसेच आयकर विभागाच्या या आदेशाचा एअरलाइनच्या कामकाजावर आर्थिक किंवा इतर कामांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचंही कंपनीने स्पष्ट केलं आहे.

# रश्मिका मंदाना व विजय देवरकोंडाची लंच डेट!

बहुचर्चित व बहुप्रतीक्षित 'सिकंदर' चित्रपट ३० मार्चला प्रदर्शित झाला आहे. सलमान खानच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'सिकंदर' चित्रपटात सलमान खान पहिल्यांदाच दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदानासह झळकला आहे. चित्रपटातील दोघांच्या केमिस्ट्रीने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. 'सिकंदर' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर रश्मिका मंदाना कथित बॉयफ्रेंड विजय देवरकोंडाबरोबर पाहायला मिळाली. दोघांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरेंद्र चावला' व 'मानव मंगलानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर रश्मिका मंदाना व विजय देवरकोंडाचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये दोघं मुंबईतील एका रेस्टॉरंट बाहेर पाहायला मिळत आहेत. या रेस्टॉरंटमध्ये रश्मिका व विजय लंच डेटसाठी वेगवेगळे पोहोचले होते आणि डेटनंतरही वेगवेगळे रेस्टॉरंट बाहेर पडले. यावेळी रश्मिकाने पापाराझींसाठी पोज दिल्या. पण विजय थेट तोंडाला मास्क लावून पापाराझींना हॅलो करून पोज न देता निघून गेला.लंच डेटला विजय देवरकोंडा कूल लूकमध्ये पाहायला मिळाला. विजयने पांढरा शर्ट आणि त्यावर मॅचिंग पॅन्ट घातली होती. त्याबरोबर त्याने टोपी



घातली होती. तसंच रश्मिका मंदाना कॅज्युअल लूकमध्ये दिसली. क्रॉप टॉप आणि जीन्समध्ये रश्मिका पाहायला मिळाली. रश्मिका व विजयच्या लंच डेटच्या व्हिडीओने सध्या सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.रश्मिका मंदाना व विजय देवरकोंडाचा हा व्हायरल व्हिडीओ पाहून चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. रश्मिका व विजय कधी प्रेमाची कबुली देतात या क्षणाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. अनेक कलाकारांनी दोघं एकमेकांना डेट करत असल्याची हिंट दिली आहे. एवढंच नाहीतर दरवर्षी दोघांच्या लग्नाची अफवादेखील पसरते. ज्यावर दोघं कधीही भाष्य करत नाहीत. पण, रश्मिका व विजय नेहमी एकमेकांबरोबर क्वालिटी टाइम स्पेंड करत असतात. दरम्यान, 'सिकंदर' या चित्रपटात सलमान खान, रश्मिका मंदाना व्यतिरिक्त काजल अग्रवाल, शर्मन जोशी, प्रतीक बब्बर झळकले आहेत. तसंच 'बाहुबली 'चित्रपटातील कटप्पा म्हणजे अभिनेता सत्यराज खलनायिकाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहे.

## ऐश्वर्याच्या बॉडीगार्डला किती पगार मिळतो

बॉलीवूडमधील अनेक मोठे कलाकार हे त्यांच्या लाइफस्टाईलमुळे मोठ्या चर्चेत असतात. त्यांची सिक्युरिटी, बॉडीगार्ड हादेखील अनेकदा चर्चेचा विषय असतो. ऐश्वर्या राय-बच्चन(AISHWARYA RAI BACHCHAN) ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रीपैकी एक आहे. ती जर कोणत्या कार्यक्रमांना हजर राहत असेल, तर तिच्याबरोबर तिचा बॉडीगार्ड दिसतो आता तिच्या बॉडीगार्डचा नेमका पगार किती आहे, हे जाणून घेऊ.अनेक वर्षांपासून अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चनबरोबर एक बॉडीगार्ड दिसतो. त्याचे नाव शिवराज असे आहे. तो ऐश्वर्या रायबरोबर अनेक ठिकाणी दिसतो. समोर आलेल्या माहितीनुसार, शिवराज हा बच्चन कुटुंबाचा एक भाग आहे. त्याचा पगार सुमारे महिन्याला सात लाख रुपये इतका आहे. ऐश्वर्याचा बॉडीगार्ड शिवराज हा तिच्याबरोबर अनेक कार्यक्रमांना हजेरी लावतो. ऐश्वर्याबरोबरचा त्याचा बॉण्डदेखील उत्तम असल्याचे पाहायला मिळते.

## जॅकलिनला धमक्या



बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसने फसवणूक करणारा सुकेश चंद्रशेखरविरोधात दिल्लीचे पोलिस आयुक्त संजय अरोरा यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. तिने सुकेशवर छळ आणि धमक्या दिल्याचा आरोप केला आहे.इंडियन एक्सप्रेसमधील वृत्तानुसार, जॅकलिनने काही दिवसांपूर्वी पोलिस आयुक्त संजय अरोरा आणि विशेष पोलिस आयुक्तांना मेल पाठवला आहे. त्या मेलमध्ये तिने साक्षीदारांच्या संरक्षणात यंत्रणेच्या अपयशाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. या प्रकरणात आपण साक्षीदार आहोत, तरीही त्यांच्यावर मानसिक दबाव टाकला जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना धमक्याही येत आहेत पुढे लिहिले की, मी एक जबाबदार नागरिक आहे. असे असूनही, मी अशा प्रकरणामध्ये अडकत आहे ज्यामुळे माझे भविष्य धोक्यात आले आहे.जॅकलिनने या मेलसोबत तीन वृत्तपत्रातील लेखही जोडले आहेत, ज्यात सुकेशने लिहिलेल्या पत्राची छायाचित्रे होती. सुकेश हा ठग असून तुरुंगात असल्याचे तिने लिहिले आहे. असे असतानाही तो तुरुंगातून जाहीरपणे धमक्या देत आहे. तसेच मानसिक छळ करत आहे. जॅकलीनने लिहिले आहे की, या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ आयपीसी कलमांतर्गत एफआयआर नोंदवावा. सुकेशने असे केल्याने केवळ तिची सुरक्षाच धोक्यात येत नाही .

## सिकंदर' पहिल्याच दिवशी ऑनलाइन लीक

सलमान खानचा बहुप्रतीक्षित 'सिकंदर' चित्रपट आज ( ३० मार्च ) ईदच्या निमित्ताने सर्वत्र प्रदर्शित झाला. 'टायगर ३' नंतर जवळपास दीड वर्षांनी बॉलीवूडचा भाईजान या सिनेमाच्या निमित्ताने रुपेरी पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. यामुळे सर्व चाहत्यांच्या मनात या सिनेमाबद्दल प्रचंड उत्सुकता होती. मात्र, 'सिकंदर' सिनेमा प्रदर्शित झाल्यावर पहिल्याच दिवशी निर्मात्यांना मोठा फटका बसला आहे. सलमान खानचा सिनेमा ऑनलाइन लीक झाला आहे. थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यावर पहिल्याच 'सिकंदर' लीक झाल्याने या सिनेमाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवर परिणाम होण्याची शक्यता आहे.सलमान खान आणि रश्मिका मंदान्ना यांचा 'सिकंदर' हा चित्रपट पहिल्याच दिवशी एचडी क्वालिटीमध्ये ऑनलाइन लीक झाला आहे. हा चित्रपट तमिळरॉकर्स, मुव्हीरुल्झ, फिल्मीझिला आणि टेलिग्राम ग्रुप सारख्या प्लॅटफॉर्मवर मोफत पाहण्यासाठी उपलब्ध आहे. या वेबसाइट्सवर चित्रपटाच्या बेकायदेशीर स्ट्रीमिंग लिंक्स व्हायरल करण्यात आल्या आहेत. यामुळे सिनेमाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवर देखील परिणाम होणार आहे. सरकार बेकायदेशीर स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म्सवर सतत कारवाई करत असूनही, चित्रपट प्रदर्शनाआधी किंवा पहिल्याच दिवशी लीक होणं ही एक निर्मात्यांकरता मोठी समस्या निर्माण झाली आहे. सिकंदर कॅमकॉर्डर रेकॉर्डिंगमधून लीक झाला असावा आणि त्यानंतर काही तासांतच एचडी गुणवत्तेत अपलोड करण्यात आला दावा करण्यात येत आहे. 'सिकंदर'चे दिग्दर्शन ए.आर. मुरुगदास यांनी केलं आहे. सलमान खानसह रश्मिका मंदान्ना, प्रतीक बब्बर आणि शर्मन जोशी यांच्यासह अनेक कलाकारांनी चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. दरम्यान, 'टायगर ३'नंतर सलमान दीड वर्षांनी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर परतला आहे. यामुळेच सिकंदरकडून प्रेक्षकांना प्रचंड अपेक्षा होती.



## नेहा कक्करच्या आरोपांवर आयोजकांचे प्रत्युत्तर

गायिका नेहा कक्कर(NEHA KAKKAR) ही गेल्या काही दिवसांपासून तिच्या गाण्यांमुळे नाही तर तिच्या मेलबर्नमधील कॉन्सर्टमुळे मोठ्या चर्चेत आली आहे. काही दिवसांपूर्वी नेहा कक्करचा मेलबर्नमध्ये एक कॉन्सर्ट आयोजित केला होता. या कॉन्सर्टला ती उशिरा पोहोचली, त्यामुळे तिला स्टेजवरच रडू कोसळले होते. मात्र, तिच्या उशिरा येण्याने उपस्थित प्रेक्षकही तिच्यावर चांगलेच भडकले होते. नेहा जेव्हा स्टेजवर आली, तेव्हा भडकलेल्या चाहत्यांनी तिला परत जाण्यास सांगितलं. त्यानंतर तिला रडू कोसळलं. तिने माफी मागितली, मात्र प्रेक्षकांनी तिला परतण्यास सांगितले. नेहा कक्करने त्यानंतर एक पोस्ट शेअर करीत मेलबर्नमधील कॉन्सर्टला तिला उशीर का झाला याबद्दल लिहिले होते. तिने तिच्या पोस्टमध्ये म्हटले होते की, मी तीन तास उशिरा गेले, पण माझ्याबरोबर कोणत्या गोष्टी घडल्या याबद्दल मला कोणीही विचारलं नाही. आयोजक माझे आणि इतरांचे पैसे घेऊन पळून गेले. माझ्या बँडला जेवण, हॉटेल आणि पाणीही दिले गेले नाही. ध्वनी तपासणीसाठी पैसे दिले न गेल्याने आम्हाला त्यासाठी उशीर झाला. आम्हाला हेदेखील माहीत नव्हते की कॉन्सर्ट सुरू आहे की नाही, कारण आयोजकांनी माझ्या व्यवस्थापकाचे फोन उचलणे बंद केले होते, असे म्हणत नेहा कक्करने आयोजकांमुळे तिला त्रास झाल्याचे म्हटले होते. तसेच त्यांची गैरसोय केल्याचेही तिने म्हटले होते.आता नेहा कक्करने आयोजकांवर केलेल्या या आरोपानंतर आयोजकांनी त्यांची बाजू मांडली आहे. नेहा कक्करने लावलेले हे आरोप खोटे असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. याबरोबरच नेहा कक्करच्या या कॉन्सर्टमुळे मोठे नुकसान झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. बिट्स प्रॉडक्शन या कंपनीने नेहाचा कॉन्सर्ट आयोजित केला होता.

# दिल्लीचा हैदराबादवर विजय!

## मिचेल स्टार्कने 5 विकेट्स घेत बजावली मोठी भूमिका

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्ली कॅपिटल्सने रोमहर्षक सामन्यात वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादवर ७ विकेट्सने मोठा शानदार विजय मिळवला आहे. सनरायझर्स हैदराबाद संघाला सर्वबाद करत दिल्लीने २५ चेंडू बाकी ठेवत विजय मिळवला. दिल्लीने सुरूवातीपासूनच सामन्यात आपला दबदबा कायम ठेवला आणि अखेरीस विजय मिळवून गतवर्षीच्या सामन्यातील पराभवाचा व्याजासकट बदला घेतला.**



मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स आणि नंतर प्रत्येक फलंदाजाने फलंदाजीत दिलेले योगदान यामुळे दिल्लीचा संघ हा सलग दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरली. अभिषेक पोरेलने १६व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी षटकार लगावत दिल्लीचा विजय निश्चित केला. यासह दिल्ली कॅपिटल्सने यंदाच्या आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत आरसीबीनंतर दुसरे स्थान गाठले आहे. दिल्लीच्या संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट फिल्डिंग करत एकापेक्षा एक अनोखे झेल टिपले आणि या क्षेत्ररक्षणाच्या आणि पहिल्या डावातील कामगिरीच्या जोरावर दिल्लीने विजयाचा पाया रचला. गतवर्षीच्या आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबाद संघाने दिल्लीविरूद्ध २६६ धावांची सर्वात मोठी धावसंख्या उभारली होती आणि प्रत्युत्तरात दिल्ली संघाला १९९ धावांवर सर्वबाद केले होते. या सामन्यात ट्रॅव्हिस हेडने ८९ धावांची तर अभिषेक शर्माने ४२ धावांची खेळी केली होती. पण दिल्लीने यंदा हैदराबादचा लाजिरवाणा पराभव करत बदला घेतला आहे. सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीने चांगली सुरूवात केली. जेक फ्रेझर मॅकगर्क आणि फाफ डू प्लेसिस यांनी पहिल्या विकेटसाठी ८१ धावांची भागीदारी केली. तर फाफ डू प्लेसिसने २७ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकारांसह ५० धावा करत बाद झाला. याशिवाय जेक फ्रेझर मॅकगर्कने ३२ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह ३८ धावांचे योगदान दिले. यानंतर आलेल्या केएल राहुलने शमीच्या षटकात वादळी फटकेबाजी करत ३०० च्या स्ट्राईक रेटने ५ चेंडूत १५ धावा करत बाद झाला.राहुलच्या विकेटनंतर ट्रिस्टन स्टब्स आणि अभिषेक पोरेलने संघाचा डाव सावरत विजय मिळवून देत नाबाद माघारी परतले. स्टब्सने १४ चेंडूत ३ चौकारांसह २१ धावा केल्या. तर अभिषेक पोरेल १८ चेंडूत २ चौकार आणि २ षटकार लगावत ३४ धावा करत नाबाद परतला. सनरायझर्स हैदराबाद संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण हैदराबादचा हा निर्णय त्यांच्यावरच उलटला. हैदराबादची विस्फोटक सलामी खेळी या सामन्यात फेल ठरली. अभिषेक शर्मा पहिल्याच षटकात विचित्र पद्धतीने झेलबाद झाला. तर पॉवरप्लेमध्येच स्टार्कने दोन षटकात हैदराबादला ३ झटके दिले. स्टार्कने ट्रॅव्हिस हेड, इशान किशन आणि नितीश रेड्डीच्या विकेट घेत हैदराबादला धक्का दिला. यानंतर अनिकेत वर्माने एकट्याने हैदराबादला १५० च्या वर पोहोचवले. अनिकेते ४१ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह ७४ धावांची शानदार खेळी केली. तर क्लासेन ३२ धावा करत बाद झाला. याशिवाय कोणताच फलंदाज १० धावांचा आकडाही गाठू शकला नाही.

### कुलदीपने 3 विकेट्स घेतले

दिल्लीकडून स्टार्कने ३.४ षटकांत ३५ धावा देत ५ विकेट्स घेतले. तर कुलदीपने ४ षटकांत २२ धावा देत ३ विकेट्स घेतले. याशिवाय मोहित शर्माच्या खात्यात महत्त्वाची क्लासेनची विकेट मिळाली. यासह हैदराबादचा संघ १६३ धावा करत सर्वबाद झाला.मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स आणि नंतर प्रत्येक फलंदाजाने फलंदाजीत दिलेले योगदान यामुळे दिल्लीचा संघ हा सलग दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरली.अभिषेक पोरेलने १६व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी षटकार लगावत दिल्लीचा विजय निश्चित केला. यासह दिल्ली कॅपिटल्सने यंदाच्या आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत आरसीबीनंतर दुसरे स्थान गाठले आहे. दिल्लीच्या संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट फिल्डिंग करत एकापेक्षा एक अनोखे झेल टिपले आणि या क्षेत्ररक्षणाच्या आणि पहिल्या डावातील कामगिरीच्या जोरावर दिल्लीने विजयाचा पाया रचला.

# शेन वॉर्नच्या मृत्यूमागे भारतीय औषध?

## वॉर्नच्या निधनाबाबत तीन वर्षांनंतर थायलंडमधून धक्कादायक खुलासे

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**ऑस्ट्रेलियाचा माजी दिग्गज फिरकीपटू शेन वॉर्नचे एप्रिल २०२२ मध्ये थायलंडमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ५२ व्या वर्षी निधन झाले होते. त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला असल्याचे सांगितले जात असले तरी, या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे. वॉर्नच्या निधनाबाबत नुकतेच काही धक्कादायक खुलासे झाले आहेत.**



एका अहवालानुसार, वॉर्नच्या मृत्यूमागे भारतीय औषध असू शकते, असे या प्रकरणाच्या चौकशीत सहभागी असलेल्या एका अधिकाऱ्याने उघड केले आहे. शेन वॉर्नचा मृत्यू झाला त्याठिकाणी एका पोलीस अधिकाऱ्याला कामाग्राची एक बाटली सापडली होती. कामाग्रा हे इरेक्टाइल डिसफंक्शन असलेल्यांसाठी वापरले जाणारे औषध आहे. या औषधात व्हायग्रासारखेच घटक असतात परंतु हृदयरोग असलेल्या लोकांनी ते वापरू नये असे म्हटले जाते. याबाबत लंडनस्थित डेली मेल या संकेतस्थळाने वृत्त दिले आहे.एका पोलीस अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दावा केला की, काही वरिष्ठ लोकांनी त्यांना त्या ठिकाणाहून औषध हटवण्यास सांगितले होते. कारण त्यांना वॉर्नसारख्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाच्या मृत्यूची बातमी अशा प्रकारे बाहेर येऊ नये असे वाटत होते. आम्हाला आमच्या वरिष्ठांनी कामग्राची बाटली हटवण्याचे आदेश दिले होते. हे आदेश वरून आले होते आणि मला वाटते की, ऑस्ट्रेलियातील वरिष्ठ अधिकारी देखील यात सहभागी होते. कारण, त्यांना त्यांच्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाचा असा शेवट होऊ नये असे वाटत होते", असे या पोलीस अधिकाऱ्याने सांगितेल. हा अधिकारी पुढे म्हणाला की, "अधिकृत अहवालात असे म्हटले आहे की, शेन वॉर्नला हृदयविकाराचा झटका आला होता. हा झटका कशामुळे झाला असावा याबद्दल इतर कोणतीही माहिती नव्हती. कामग्राची पुष्टी करण्यासाठी कोणीही पुढे आले नाही कारण हा एक संवेदनशील विषय होता. या सर्वामागे अनेक शक्तिशाली अदृश्य हात होते." "तिथे कामाग्राची एक बाटली होती, परंतु त्याने त्यातील किती औषध घेतले हे आम्हाला माहित नाही. घटनास्थळी उलट्या आणि रक्ताचा डबा देखील होता.

### तिथे कामाग्राची एक बाटली

परंतु आम्हाला सांगितल्याप्रमाणे आम्ही कामग्राची बाटली हटवली", असे हा अधिकारी शेवटी म्हणाला.वॉर्नच्या मृत्यूनंतर सुरत थानी रुग्णालयाने दिलेल्या शवविच्छेदन अहवालात, वॉर्नचा मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे झाला असे म्हटले होते. त्यामुळे शेन वॉर्नच्या मृत्यूमागे कोणत्याही प्रकारच्या कट असल्याची शक्यता नाकारण्यात आली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार ।

। दि. 31 मार्च 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046